सकाळ
मंगळवार, ६ ऑगस्ट २०२४

# कामगाराचा मुलगा झाला फौजदार

पन्हाळा, ता. ५ : पन्हाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या निकमवाडीतील एम.आय.डी.सी.त काम करणाऱ्या तातोबा निकम यांचा मुलगा तुषार तातोबा निकम यांने मंत्रालय सहायक म्हणून नोकरी करत पोलिस उपनिरीक्षकपदी यश मिळविले.

तुषार यांचे प्राथमिक शिक्षण गावातील जिल्हा परिषदेच्या शाळेत, माध्यमिक शिक्षक पन्हाळा विद्या मंदिर येथे, तर विवेकानंद कॉलेज कोल्हापूर येथे बी.एस्सी.पर्यंतचे शिक्षण झाले.



तुषार निकम

त्यानंतर मंत्रालय सहायकपदी कार्यरत होता. त्यांनी नोकरी सांभाळत अभ्यासाचे वेळापत्रक तयार केले. वेळेचा सदुपयोग करत मन लावून अभ्यास केला आणि पीएसआयपदी यश मिळविले. आई-वडील, बहीण, भाऊ, मामा आणि नातेवाइकांचे प्रोत्साहन मिळाल्याचे त्यांने आवर्जून सांगितले.

तरुण भारत

बुधवार, ७ ऑगस्ट २०२४

# निकमवाडीच्या तुषारचे पोलीस बनण्याचे स्वप्न पूर्ण...!

**प्रतिनिधी**
पन्हाळा

▪ मंत्रालय सहाय्यक पदावरकार्यरत असताना पोलिस खात्याला पसंती

पन्हाळा तालुक्यातील निकमवाडी येथील तुषार निकम हा मंत्रालय सहाय्यकपदावर कार्यरत होता. पण त्यांचे स्वप्न होते ते म्हणजे आपल्या अंगावर खाकी वर्दी घालून समाजसेवा करायचे. यामुळे तुषार ने मंत्रालयसहाय्यक पदी कार्यरत असताना मोकळ्या वेळेत अभ्यास करत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या पोलिस उपनिरीक्षक पदाच्या परिक्षेत यश मिळवले.



तुषारने प्राथमिक शिक्षण हे गावातीलच विद्यामंदीर शाळेत तर माध्यामिक शिक्षण पन्हाळा विद्यामंदीर येथे घेतले.त्यानंतर ११ वी व१२ वी सायन्स यानंतर बीएस्सी पदवीपर्यंतचे शिक्षण कोल्हापुर येथील विवेकानंद कॉलेजमध्ये पुर्ण केले. त्याने २०१५ पासुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा अभ्यास सुरु केला. मागील वर्षी त्यांची मंत्रालय सहाय्यक पदी वर्णी लागली. आपल्याला खाकी वर्दी मिळालेली नाही, ही सल त्याच्या मनात होती. त्यामुळे तुषारने या नोकरीसह अभ्यास करत चिकाटी व जिद्दीच्या जोरावर अखेर पोलिस उपनिरीक्षक पदाला गवसणी घातली.तुषारचे वडील एमआयडीसी येथे फॉन्ड्री कामगार तर आई शेती कामावर असायची. यावेळी तुषारचे मामा माजी सरपंच कृष्णात खोत यांनी तुषारला आर्थिक आणि मानसिक आधार दिला.

विशेष म्हणजे तुषारने यासाठी कोणतेही क्लास लावले नव्हते. .यासाठी त्याला कायदा तज्ञ उत्तम पवार यांचे मार्गदर्शन तर भाऊ तेजस निकम याची साथ मिळाली. त्यांच्या या यशामुळे त्यांचे परिसरात कौतुक होत आहे.